**महाराष्ट्र शासन**

**<u>अत्यंत महत्वाचे</u>**

क्र : मग्रारो- २०१३/प्र.क्र.१४०/रोहयो-७
नियोजन विभाग (रोहयो)
नविन प्रशासन भवन १६ वा मजला
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:- १४/०३/२०१४

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

**विषय :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत कुशल कामाचे प्रदान करताना घ्यावयाची दक्षता**

महोदय,

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षणामध्ये असे आढळून आले आहे की, क्षेत्रियस्तरावर कुशल कामांचे प्रदान दर्शनी धनादेश (Bearer Cheque) / रोखीन करण्यात येत आहे. ही बाब गंभीर स्वरुपाची असून वित्तिय अनियमितताही आहे. संविधानिक लेखापरिक्षक (Statutory Auditor) यांनीही याबाबत आक्षेप नोंदविले आहेत. तेव्हा वित्तिय अनियमितता होऊ नये या दृष्टीने खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

- ग्रामपंचायतींनी कुशल कामाच्या रकमेचे प्रदान पुरवठादारांना रेखांकीत धनादेशाद्वारे (Crossed cheque) करावे.
- योजना राबविणा-या यंत्रणानी (कृषी, वन, सामाजिक वनीकरण इ.) कुशल कामाच्या रकमेचे प्रदान पुरवठादारांना रेखांकीत धनादेशाद्वारेच (Crossed cheque) करावे.
- तहसिलदार कार्यालयांनी यंत्रणांना कुशल कामांच्या रक्कमांचे धनादेश कोणत्याही परिस्थितीत दर्शनी धनादेश (Bearer Cheque) द्वारे न देता ते रेखांकीत धनादेशाद्वारे (Crossed cheque) द्यावे.

२. उपरोक्त निदेश तातडीने अंमलात आणण्याच्या सूचना जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरापर्यंतच्या मगांराग्रारोहयो कामांशी संबंधित सर्व क्षेत्रिय अधिकारी / कर्मचा-यांना देण्यात याव्यात. तसेच सदरहू निर्देशचे उल्लंघन केल्यास संबंधितास व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल असेही कळवावे, ही विनंती.

आपला विश्वासु,

**(वि. पु. काळे)**
**अवर सचिव, रोहयो**

प्रत :-

आयुक्त नरेगा, नागपूर
सर्व विभागीय आयुक्त, यांनी कृपया वरील निदेशांचे पालन संबंधितांकडून होईल यावर नियंत्रण ठेवावे.

D:\sushama\Noting.doc